# गर्भाशयमुखाचा कर्करोग

**गर्भाशयमुखाचा कर्करोग म्हणजे काय?**

कर्करोगात शरीरातील पेशी अनिर्बंध वाढतात. ज्या भागात कर्करोग उद्भावतो त्या त्या भागाचे नाव त्या कर्करोगांस दिले जाते. गर्भाशय मुखात कर्करोगाचा उद्भाव झाल्यास त्यास गर्भाशय मुखाचा कर्करोग असे म्हणतात. गर्भाशयमुख हा गर्भपिशवीचा सर्वात खालचा अरुंद असलेला शेवटचा भाग आहे. गर्भाशय मुख योनी मार्गास गर्भपिशवीच्या वरील भागास जोडते. गर्भपिशवीमध्ये गर्भावस्थेत गर्भाची वाढ होते. गर्भाशयमुखाचा कर्करोग हा स्त्रीरोगातील प्रतिरोधास व उपचारास सर्वात सोपा आजार आहे जर त्याचे नियमित निदान केले, लवकर निदान व त्वरीत उपचार झाल्यास त्यापासून पूर्णपणे मुक्तता होऊ शकते.

**गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा धोका कशामुळे वाढतो?**

- ह्युमन पॅपीलोमावायरस (HPV) चा प्रादुर्भाव
- धुम्रपान ६० पेक्षा अधिक वय आणि स्थूलता
- काही संप्रेरके आणि वंध्यत्वावरील औषधे
- अंडाशय, स्तन किंवा मोठया आतडयातील कर्करोगाचा इतिहास
- मातेच्या गर्भावस्थेत डायईथाईल स्टीलबेस्ट्रॉलच्या संपर्कात येणे

**गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची लक्षणे आणि चिन्हे**

- संभोगानंतर रक्तस्त्राव
- मासिकपाळी शिवाय योनीमार्गातून रक्तस्त्राव
- रजोनिवृत्ती नंतर योनीमार्गातून रक्तस्त्राव
- ओटीपोट व कंबरदुखी
- पायांवर सूज व दुखणे

**गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे निदान कसे होते?**

- **पॅपस्मियर चाचणी**- गर्भाशयमुखावर काही अयोग्य पेशींची वाढ झालेली नाही हे पाहण्यासाठी केली जाणारी चाचणी त्यासाठी गर्भाशयमुखावरील काही पेशी तपासणीसाठी घेतल्या जातात.
- **कॅल्पोस्कोपी**-कॅल्पोस्कोपीमध्ये गर्भाशयमुख आणि योनीचे सखोल परिक्षण केले जाते.
- **बायोप्सी**- गर्भाशयमुखाचा छोटासा तुकडा काढून तपासणीसाठी घेतला जातो. तो प्रयोगशाळेत पाठवून कर्करोगाची चाचणी केली जाते. हा नमुना कॅल्पोस्कोपी किंवा सर्व्हायकल कोन बायोप्सी द्वारे काढला जातो.
- **सीटी व एमआरआय-** यामध्ये कर्करोगाचे स्थान व आकार समजतो. यासाठी रुग्णास वेगवेगळया रंगाचा द्राव दिला जातो ज्यामुळे सर्व प्रतिमा व्यवस्थित घेता येतात.

**गर्भाशयमुखाच्या कर्करोगावर उपचार काय करतात?**

- **रेडिएशन थेरपी**- अतिशय उच्च क्षमतेचे किरण सोडून कर्करोगाच्या पेशी मारल्या जातात.
- **केमोथरपी**- कर्करोगाच्या पेशी मारण्यासाठी औषधे दिली जातात.
- **टारगेटेड थेरपी**- सुदृढ पेशी न मारता फक्त कर्करोगाच्या पेशींचाच नाश केला जातो.
- **शस्त्रक्रिया-** शस्त्रक्रियेने गर्भाशय मुखाचा कर्करोग काढून टाकला जातो (जर हा कर्करोग पसरला असेल तर ) तसेच गरज असल्यास योनी वा तिचे भाग , मुत्राशय किंवा गुदाशयाचा शेवटचा भाग काढला जातो.

**गर्भाशयमुखाचा कर्करोग होऊ नये यासाठी काय करावे?**

- **नियमितपणे पॅपस्मियर** चाचणी करावी त्यामुळे कर्करोगाची शक्यता निर्माण करणा-या पेशी आधीच पाहता येतील.
- **HPV लस** घ्यावी या HPV लसीमुळे गर्भाशयमुख योनी आणि फुप्फुसाच्या कर्करोगास प्रतिबंध होतो.

**संदर्भ- मायक्रोमेडेक्स ऑनलाईन सोल्यूशन्स 2.0**